पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/६८७/२०१२
दिनांक- ०३/०५/२०१२

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ८.५.२०१२ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ८.५.२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- ५

दिनांक- ८.५.२०१२ वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ८/५/२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक २/५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ४) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.G-१/२१/२४/२०११-१२ मधील अ.क्र.६ अन्वये, चापेकर चौक ते दळवीनगर आरओबी पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व मजबुतीकरण करणेकामी मे.पी बी ए इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रू. १,८६,७४,०९२/- [र.रू.एक कोटी शहाऐंशी लाख चौऱ्याहत्तर हजार ब्यान्नव] पेक्षा ६.०१ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,८४,२९,३६८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक ८.५.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) मनपाच्या विविध विभागांव्दारे सातत्याने छपाई साहित्याची मागणी होत असल्याने आणखी २ महिने कालावधीसाठी मे.आशिष एंटरप्रायजेस, चिंचवड यांना मिळालेल्या एकूण कामाच्या र.रू.२२,४४,५००/- च्या १५ % - र.रू.३,३६,६७५/- [र.रू.तीन लाख छत्तीस हजार सहाशे पंच्याहत्तर] एवढ्या रक्कमेचे वाढीव काम करून घेणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक ८.५.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) कासारवाडी येथे ४० एम.एल.डी. व सांगवी येथे २० एम.एल.डी. एकुण ६० एम.एल.डी. क्षमतेचे मैलाशुध्दीकरण केंद्र बांधणे व ३ महिने चालन आणि ५ वर्षे देखभाल दुरुस्ती करणे कामाचे

वाढीव र.रू.२=२३ कोटी खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४) प्रस्तावात नमुदप्रमाणे [अ.क्र.१ ते ६ एकुण खर्च र.रु.३,२१,२५१/-] महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०१२ करीता विविध साहित्य कालमर्यादा, तातडीची गरज लक्षात घेऊन खरेदी केलेले असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ५) आंद्रा/भामा आसखेड धरणातून पिंपरी-चिंचवड मनपासाठी पाणी आणणेकामी प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे थेट पध्दतीने देण्याच्या प्रस्तावास व सर्वेक्षणाच्या कामासाठी प्रथमतः र.रू.३,००,०००/- [र.रू.तीन लाख] महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार विभाग, पुणे-१ यांना अदा करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ६) मे.शुभम उद्योग यांनी ठेकेदारी पध्दतीने पुरविलेल्या कॉम्प्युटर ऑपरेटर कर्मचाऱ्यांची दि.२५/११/२०११ पासून ६ महिने मंजुर मुदतवाढीस अनुसरून किमान वेतन आयोगातील तरतुदी नुसार र.रू.७,६६३/- [र.रू.सात हजार सहाशे त्रेसष्ट] प्रति कर्मचारी प्रति महिना याप्रमाणे प्रत्यक्ष जादा अथवा वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ७) मोशी कचरा डेपो येथे चैन बुलडोझर च्या सहाय्याने कचरा सपाटीकरण करणे कामासाठी मे.नॅशनल अर्थ मुव्हर्स यांनी दिलेला दर निविदा दरापेक्षा -१३% कमी असल्याने तसेच कामाची निकड व तातडी लक्षात घेता मे.नॅशनल अर्थ मुव्हर्स यांची -१३% कमी म्हणजेच प्रतितास र.रू.१,५७४/- या दराने र.रू.६१,७०,०८०/- [र.रू.एकसष्ट लाख सत्तर हजार ऐंशी] सर्व करासहीत या रक्कमेची निविदा मंजूर करणेस व त्याप्रमाणे निविदा अटी व शर्तीनुसार त्यांचेशी करारनामा करून त्यांना कामाचा आदेश देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
[नि.र.रु.७०,९१,२८०/-]

विषय क्रमांक- ८) मनपाच्या उद्यान विभागाकडील लघुनिविदा क्र.३/२०११-२०१२ अन्वये, मनपाचे अ व ब प्रभागातील धोकादायक, वाळलेली, विकास कामात अडथळा ठरणारी व रस्ता रूंदीकरणात बाधीत होणारी झाडे स्वखर्चाने काढून विल्हेवाट लावणेकामी मे.महालक्ष्मी एन्टरप्रायजेस यांची र.रू.१,५५०/- प्रति टन या दराने आलेली निविदा सर्वात जास्त दराची असल्याने त्याचेशी

करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.
(नि.र.रू.३,८०,०००/- [र.रू.तीन लाख ऐंशी हजार])

विषय क्रमांक- ९) मनपाच्या उद्यान विभागाकडील लघुनिविदा क्र.३/२०११-२०१२ अन्वये, मनपाचे क व ड प्रभागातील धोकादायक, वाळलेली, विकास कामात अडथळा ठरणारी व रस्तारूंदीकरणात बाधीत होणारी झाडे स्वखर्चाने काढून विल्हेवाट लावणेकामी मे.महालक्ष्मी एन्टरप्रायजेस यांची र.रू.१,५५०/- प्रति टन या दराने आलेली निविदा सर्वात जास्त दराची असल्याने त्याचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.
(नि.र.रू.३,८०,०००/- [र.रू.तीन लाख ऐंशी हजार])

विषय क्रमांक- १०) मनपाला पावसाळ्यामध्ये Potholes बुजविणेकरिता आवश्यक असलेले ४८ बॅग (२.४० टन) खरेदीकामी Shell Bitumen India Ltd याकंपनीस र.रू.४९,०००/- [र.रू.एकोणपन्नास हजार] अदा केले असलेने सदर खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ११) मनपाच्या ब प्रभाग विद्युत विभाग कार्यक्षेत्रातील बळवंत कॉलनी, शिवप्रसाद कॉलनी, चिंचवडेनगर, स्वामी विवेकानंद सोसायटी, शेवंताबन सोसायटी, ओमसाई कॉलनी व मनपा दवाखाना वाल्हेकरवाडी परिसरातील स्ट्रिटलाईटकरीता वीजपुरवठ्याचे वीजमीटरकरीता म.रा.वि.वि.कं.ला र.रू.३८,१२४/- [र.रू. अडोतीस हजार एकशे चोवीस] अदा करणे आवश्यक असल्याने सदरच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १२) मनपाचे JNNURM अंतर्गत BSUP प्रकल्पासाठी विद्युत स्वीचिंग स्टेशन उभारणेकरीता EWS project चिखली से.क्र.१७ व १९ मधील ५००० चौ.फुट जागा म.रा.वि.वितरण कंपनी यांना विनामोबदला हस्तांतरीत करणेस व त्यापोटीचे मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क मनपाने भरण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १३) मनपाच्या जकात विभागासाठी आवश्यक प्रतिज्ञापत्र पॅड छपाई करुन पुरवठा करणेकामी ई.नि.सू.क्रं.२१/३-२०११-१२ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.ओम ऑफसेट प्रिंटर्स, भोसरी यांचे दर प्रती पुस्तक र.रु.३८/०४ एकूण र.रु.१३,३१,४००/- स्विकृत

करुन करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १४) मनपाच्या सार्वजनिक वाचनालय विभागास पुस्तके खरेदीकामी ई-निविदा सुचना क्र.२३/५/२०११-१२ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.जयेश एजन्सी, पुणे यांचेकडून १९९ पुस्तकांचा एक सेटप्रमाणे १५ वाचनालयांसाठी प्रत्येकी एक सेट र.रु.६८,०००/- मध्ये असे एकुण १९९ पुस्तकांचा एक सेट प्रमाणे १५ सेट २९८५ पुस्तके एकूण रक्कम रुपये १०,२०,०००/-मध्ये खरेदीकामी केलेला करारनामा संविधा अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १५) मनपाच्या जकात विभागासाठी आवश्यक एस्कॉर्ट पावती पुस्तके छपाई करुन पुरवठा करणेकामी ई.नि.सू.क्रं.२१/२-२०११-१२ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.ओम ऑफसेट प्रिंटर्स, भोसरी यांचे दर प्रती पुस्तक र.रु.३५/१८ एकूण र.रु.१४,०७,२००/- स्विकृत करुन करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/४/कावि/६८७/२०१२
दिनांक : ०३/०५/२०१२ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.